**<u>वादी क्र.२ यांचा उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते ९ तर्फे विधीज्ञ श्री.एस. व्ही. शिवणे यांच्यामार्फत शपथेवर पुन्हा सुरू.</u>**

**१६.** गट नं.२४९ मधील संपूर्ण क्षेत्र १२ एकर २७ गुंठे च्या मुळ मालक रियासत बानू होत्या. मला या केसबाबत माझ्या वडीलांनी सांगितलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, रियासत बानू यांची वरील जमिन सन १९६३ ते १९६५ या कालावधीमध्ये बापूशा बैकरे कसत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या जमिनीचा विक्रीचा ठराव रियासत बानू व एकट्या बापूशामध्ये झाला. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, रियासत बानू व बापूशा तसेच खंडूजी बैकरे यांच्यामध्ये झाला. त्या ठरावाचे लिखापडी ॲड कृष्णाराव देशमुख यांच्या अहमदपूर येथील कार्यालयात झाली होती किंवा कसे ते मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या जमिनीची किंमत रुपये ६०,०००/– ठरली होती. तो ठराव हनुमंत येरमे, किसन नालापूरे, काळोबा माळी, निवृत्तीराव देशमुख, बळवंतराव देशमुख यांच्यासमक्ष झाला होता किंवा कसे ते मला माहित नाही. त्या ठरावावर वरील लोकांच्या सह्या आहेत किंवा कसे ते मी पाहिलेले नाही. तो ठराव ४ रुपये ५० पैशाच्या मुद्रांकावर लिहला होता किंवा कसे ते मला माहित नाही. त्या ठराव पत्रावर लिहून घेणार म्हणून बापूशा बैकरे यांची सही आहे किंवा कसे ते मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, तो ठराव गुढीपाढवा १९६५ रोजी झाला होता.

**१७.** हे म्हणणे खरे आहे की, रियासत बानू यांचे कुलमुक्त्यार वारस अली हे होते. हे म्हणणे खरे आहे की, वारस अली याची कुलमुक्त्यार या नात्याने लिहून देणार म्हणून सही आहे. हे म्हणणे खरे नाही की, ठरावाच्यादिवशी एकट्या बापूशा यांनी वारस अली यांना रुपये ५,०००/– दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर सहा महिन्यांनी एकट्या बापूशा यांनी रुपये २,०००/– दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, ठरावाच्यादिवशी मिळकतीचा ताबा एकट्या बापूशाला देण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या ठरावानंतर एकट्या बापूशाच्या नावे दिनांक २२.०७.१९६५ रोजी फेरफार क्र.४ नोंदवण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, तो फेर नोंदवण्याअगोदर तलाठी यांनी रियासत बानू यांना रितसर नोटीस पाठविली होती. ती नोटीस मिळाल्यानंतर रियासत बानू यांनी त्या फेरफारास हरकत नसल्याचे कळवले होते किंवा कसे ते मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, रियासत बापू यांचा आक्षेप नसल्याची नोंद फेरफात प्रकरणात घेण्यात आली आहे. रियासत बानू यांची फेरफार प्रकरणी स्वतंत्र जबाणी घेतल्याची नोंद फेरफार प्रकरणात आहे किंवा कसे ते मला

माहित नाही. रियासत बानू यांचे वारस वारस अली व कुलमुक्त्यार हे होते. रियासत बानू यांचे वारस विर सरफराज अली होते किंवा कसे ते मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, विर सरफराज अली यांनी दावा मिळकतीच्या ताब्याकरीता बापूशा बैकरे विरूध्द दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अहमदपूर येथे दावा क्र.२७४/२००३ केला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्यामध्ये माझ्या वडीलांना तसेच प्रतिवादी क्र.१० ते १३ यांच्या वडीलांना प्रतिवादी केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, तो दावा फक्त बापूशा यांच्याविरूध्द होता. हे म्हणणे खरे आहे की, तो दावा मे. न्यायालयाने नामंजूर केला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या निकालाविरूध्द त्या दाव्यातील वादी यांनी मा. जिल्हा न्यायालयात अपील क्र.१५२/२००६ व नविन अपील क्र.१५४/२०११ केले होते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०३.०५.२०13 रोजीच्या निकालाने ते अपील नामंजूर करण्यात आले. दावा व अपील चालू असल्याचे मला माहित होते. आम्ही त्या दाव्यामध्ये तिराईत इसमाने हजर झालो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, जमिन फक्त बापूशाच्या ताब्यात असल्याने रियासत बानूच्या वारसांनी दावा फक्तबापूशा विरूध्द केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सन १९६३ पासून ताब्यासदरी ७/१२ उताऱ्याला बापूशाची नोंद आहे. हे म्हणणे खरे नाही की, बापूशाच्या मृत्यूनंतर या दाव्यातील प्रतिवादी क्र.१ ते ९ यांची नोंद बापूशाचे वारस म्हणून लागलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजतागायत दावा मिळकतीवर प्रतिवादी क्र.१ ते ९ यांचा ताबा आहे. बापूशा हयात असेपर्यंत आम्ही वाटणीचा दावा केला नव्हता. आम्ही आजतागायत बापूशाचे वारस यांच्याविरूध्दही वाटणीचा दावा केलेला नाही. आम्ही फेरफार क्र.४ लाही आक्षेप घेतलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, सन १९६३ पासून बापूशा व त्यांच्या मृत्यूनंतर बापूशाचे वारस दावा मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत.

**१८.** बापूशा दिनांक १४.०२.२००५ रोजी मयत झाले. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २२.०७.२००५ रोजी बापूशाच्या वारसांच्या नावे फेरफार मंजूर झाला. हे म्हणणे खरे आहे की, तेव्हापासून प्रतिवादी क्र.१ ते ९ यांची नावे वारस म्हणून दावा मिळकतीच्या महसूल दप्तरी लागली. आम्ही दावा मिळकत कसल असल्याबाबत ७/१२ उताऱ्याला आजतागायत नोंद लावलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, शपथपत्रातील परिच्छेद क्र.९ मध्ये नमूद खरेदीखतातील दावा मिळकतीच्या चतुःसिमा चुकीच्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मैनोद्दीन मनीयार जळकोट यांच्यासमोर माझ्या वडीलांनी दिवाणी दावा क्र.५१६/२०१९ व

या दाव्यातील सर्वाधिकारपत्र दिनांक ०३.०१.२०२३ रोजी करून घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीशी माझा, माझ्या वारसांचा, माझ्या वडीलांचा तसेच प्रतिवादी क्र.९ ते १३ यांच्या वडीलांचा व वारसांचा दावा मिळकतीशी कसलाही संबंध नाही.

**(प्रतिवादी क्र.१ ते ९ यांच्या विधिज्ञांच्या तोंडी विनंतीवरून पुढील उलटतपास तहकुब)**

श्रृवणोत्तर स्वीकृत समक्ष,

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2025.11.13 12:08:44 +0530

( **स्वानंदी दे. वडगांवकर**)

दिनांक – १२.११.२०२५. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,अहमदपूर.